जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि
अभिलेख, (म.राज्य)पुणे यांचे कार्यालय.
**क्रमांक: एकत्री/ तक्रारी अर्ज / निपटारा/०४**
**पुणे, दिनांक१७/३/२००४.**

## प रि प त्र क

**विषय :- एकत्रीकरण योजना**
**तक्रारी अर्ज - निपटारा अनुसरणकाम.**

भूमि अभिलेख विभागाकडून एकत्रीकरण कायदा १९४७ ची अंमल बजावणी ते एकत्रीकरण योजना राबविण्यास शासनाने दिलेली सन १९९३ मधील स्थगिती दरम्यान अनेक गांवी योजनाराबविण्यात आली . कधी कमी लक्ष्य साध्य तरी कधी कमाल अशा परिस्थितीत योजना राबविताना अनावधानाने ब-याच त्रुटी , उणिवा व चुकांमुळे शेतकरी वर्गास नाहक त्रास झाला. त्यांनी अर्ज विनंत्या करुन आपल्या तक्रारीची दाद मागून घेतली . तरी ही आज मितीस दुरुस्ती योजना, शुध्दपत्रके यांचे अनुसरुन काम ही ब-याच मोठया प्रमाणावर प्रलंबित आहे. मात्र आपण आजूनही त्याकडे पुरेशा गांभिर्याने पहात नाही त्यामुळे हे काम तसेच ठप्प झाले आहे. ही वस्तुस्थिती नाकारण्यांत अर्थ नाही.

एकत्रीकरण योजनेवरील तक्रारी अर्जाचा निपटारा करताना अदलाबदलीच्या प्रकरणत प्रत्यक्ष ताबे दिल्यानंतर वहिवाटी सुरु होवून काही वर्षे लोटल्यांनतर त्यापैकी एखाद दुसरा खातेदार मला गटबांधणी मान्य नाही म्हणून तक्रार अर्ज दाखल करतो. त्यावर खात्या अंतर्गत आवश्यक ती कार्यवाही करुन एक तर गट बांधणी नव्याने केली जाते अथवा योजने पूर्वीची ७/१२ ची स्थिती कायम ठेवून दुरुस्ती योजना मंजूर केली जाते. अशाच एक प्रकरणात मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठाने पुन्हा गुंडा तुका विरुध्द पंढरीनाथ शिंदे प्रकरणात जे आपले मत स्पष्ट पणे नोंदविले हेते, तेच पुन्हा या प्रकरणात (सिंदगोंडा वि.ज.आ. नव्याने नोंदवून एकत्रीकरण कायदा १९(१)अन्वये योजना प्रसिध्द झाल्यानंतर ३० दिवसांच्या मुदतीत अशी गट बांधणी करणा-या कोणत्याही खातेदाराने कसलाही आक्षेप, तक्रार हरकत नोंदवीली नसेल तर त्यांचे अशी तक्रार काही वर्षाच्या मुदतीनंतर नोंदविली असता तीची दखल घेण्याचे काहीही कारण नाही, म्हणून जमाबंदी आयुक्त पुणे यांनी १९९३ मध्ये प्रसिध्द केलेली ३२(१) खालील दुरुस्ती अनावश्यक व बेकायदेशीर असल्याचे स्पष्ट करुन रद्द केली आहे व मूळ योजनेत काही ही दोष नाही . सबब ती कायम ठेवीत आहोत असा स्पष्ट निकाल दिला आहे तो सोबत आहेच.)

अशा परिस्थितीत या पुढे प्राप्त झालेल्या तक्रारी अर्जातील असे अर्ज जे गट बांधणीच्या संदर्भात आपणाकडे प्राप्त झाले आहेत त्याचेवर कोणतीही दुरुस्तीची कार्यवाही न करता उपसंचालक भूमि अभिलेख यांनी असे सर्व अर्ज आपले कार्यालयात परत मागवून घ्यावे व या दोन निकालाचा संदर्भ देवून तक्रारी अर्जावर काही ही कार्यवाही करता येत नाही अर्ज विना कार्यवाही दप्तरी दराखल केला आहे असे अर्जदारास कळवून अशी सर्व प्रकरणे तातडीने दप्तरी दाखल करावीत अर्जदारास उत्तरासोबत नवीन निर्णयाची प्रतही माहिती साठी जोडावी.

असे न केल्यास हायकोर्टाच्या आदेशाची अंमलबजावणी न केल्याचा आदेशाची पायमल्ली केल्यांचा आरोप होउु शकतो प्रसंगी एखादा खातेदार खात्याविरुध्द न्यायालयीन आदेशाचा अवमान केला म्हणून अवमान याचिका ( Contempt of Court ) दाखल करु शकतो ही बाब विचारा आड करु नये.

**इतर प्रकरणी काय कार्यपध्दती अनुसरावी ते पुढील प्रमाणे.**

**पोटहिस्सा मोजणी तक्रार .**

केलेली पोटहिस्सा मोजणी यांचा अंमल योजना काळात सुरवातीस घेण्यास आला आहे तो दोन पध्दतीने त्या अशा :-

१) जून्या फाळणीबाराचा व योजनेवेळी केलेल्या फाळणीबाराचा अंमल रितसर फेरफार करुन धेण्यात आलेल्या प्रकरणी अर्जदाराने रितसर अधिक्षक भूमि अभिलेख यांचेकडे अपिल करावे अथवा एकत्रिकरण योजना राबविताना आधी केलेले फाळणीबारा व योजनेवेळी महसूल अधिका-याने असे फेरफार मंजूर केले असतील तर त्याचेकडे अपिल करावे असे उत्तर देवून असे सर्व अर्ज छानननी करुन निकाली काढावेत.

२) ज्या प्रकरणी फेरफार न घेता सरळ योजनेत अंमल घेतला गेला असेल त्याअर्जावरच गुणवत्तेनुसार कार्यवाही करावी गटबांधणी न झालेले अर्जच या सदरात रितसर दुरुस्तीची कार्यवाही करुन निकाली काढावेत.

३) ज्या प्रकरणात इतर हक्क ,बोझे, वहिवाटीचे हक्क, मालकी हक्क नावात बदल ए.कु.मॅ इत्यादी बाबत तक्रारी असणारे अर्ज अशा संबंधित खातेदाराना आवश्यक ते पुरावे घेवून कार्यालयात बोलावून तक्रारी संबंधात आवश्यक ते जुने अभिलेख, व पुराव्याची खात्री करुन ,जबाब घेवून निकाली काढावेत अशा प्रकरणात तालुका निरीक्षक भूमि अभिलेख यांनी गांवी जावून चौकशी करण्याची काहीही आवश्यकता नाही उदा. नावात बदल झाल्याची तक्रार असल्यास गांवी जाण्याचे प्रयोजन नाही. मोजणीची गरज नाही. त्यासाठी संबंधित खातेदाराचे मतदान ओळखपत्र जेष्ठ नागरीकाचे ओळखपत्र मतदार यादीचा उतारा, वीज बील, लाईट बील, भाडेपावती ग्रामपंचायत करत भरणा पावती, राशन कार्ड इत्यादी गोष्टी पुरावा म्हणून विचारात घेण्यात याव्यात.

**अनुसरण काम :-**

योजनेचे तसेच दुरुस्ती योजनाचे शुध्दीपत्रकाचे अनुसरुणकाम ब-याच मोठया प्रमाणात आजही प्रलंबित आहेत त्यापैकी

**आकारबंद :-**

मंजूर योजनांचे आकारबंद अदयापही प्रलंबित आहेत स.नं. च्या आकारबंदा प्रमाणे मंजूर योजनेत क्षेत्राचा अंमल घेतला आहे. अगर कसे याची शहानिशा करुन असे प्रलंबित आकारबंद त्वरेने पूर्ण करुन घेवून ते मंजूर करुन घेवून दप्तरी सामिल करणे हे काम या वर्षाअखेर पूर्ण करणे आवश्यक आहे.

मंजूर योजनेनंतर मागाहून ज्या दुरुस्त्या ३२(१) अन्वये अथवा ३१ अ खाली करण्यात आल्या त्यामुळे सुध्दा आकारबंदात त्या त्या खात्यात तसा बदल लाल शाईने घेणेचे कामही ब-याच मोठया प्रमाणात शिल्लक आहे ते देखील करणे आवश्यक आहे.

दुरुस्ती योजना वा शुध्दी पत्रकामुळे अनुसरण काम वाढते ते वेळीच केले जात नाही. दुरुस्ती योजना या शुध्दी पत्रक मंजूर झाल्यावर तसे शेरे लाल शाईने योजनेच्या पुस्तकात ठेवणे आवश्यक आहे असे शेरे ठेवलेले नाहीत त्या त्या प्रकरणातील मोजणी शीट, गुणाकार बुक ,आकारफोड वेगळे करुन ते अभिलेखात सामील करणे आवश्यक आहे. मात्र अशी कार्यवाही करण्याकडे कानाडोळा करण्यात आला आहे. त्यामुळे हे कामही भरीव प्रमाणात प्रलंबित आहे. मंजूर झालेल्या दुरुस्ती योजना शुध्दीपत्रका मुळे गांव नकाशातही आवश्यक त्या गटात क्षेत्र दुरुस्तीमुळे हद्दी बदल होतो. त्या प्रकरणी गाव नकाशा (गटाचा )दुरुस्ती होणे अभिप्रेत आहे तेथे आवश्यक नकाशा दुरुस्ती करुन नकाशा नव्याने छापून घेणे आवश्यक आहे. ते कामही नीटपणे झालेले नाही, होत नाही त्याकडे ही लक्ष्य देणे आवश्यक आहे.

महत्वाचे म्हणजे मंजूर झालेल्या दुरुस्ती योजना व शुध्दीपत्रक आता त्या त्या तालुका कार्यालयात परत करण्यात आली आहेत मात्र त्यांची रजिस्टर मध्ये नोंदणी करुन ती व्यवस्थित पणे गाववार त्या त्या गांवचे दप्तरात सामील करणे आवश्यक आहे. हे काम प्राधान्याने हाती घेणे आवयक आहे.

३) **७/१२ दुरुस्ती / फेरफार घेणे :-**

मंजूर दुरुस्ती योजना / शुध्दीपत्रकामुळे संबंधित मंजुरी नुसार तलाठयाकडील ६ड ला आवश्यक तो फेरफार घेवून संबंधित खात्याचे ७/१२ लिहिणेचे कामही ब-याच जिल्हयात शिल्लक आहे. त्याकडे वेळीच लक्ष देणे आवश्यक आहे. शुध्दीपत्रक वा दुरुस्ती योजनेचा अंमल प्रसिध्दीची मुदत संपताच घेणेचा आहे. याकडे ही सर्वाचे लक्ष वेधणेत येत आहे.

**कमी जास्त पत्रक :-**

शुध्दीपत्रक / दुरुस्ती योजनेमुळे आवश्यक त्या खात्यात कमी जास्त पत्रक करुन त्यांचा अंमल घेणेचे कामही ब-याच मोठया प्रमाणात शिल्लक आहे कमी जास्त पत्रक तयार करण्याची कार्यपध्दती अनुभवी कर्मचारी वृध्दाकडून नवीन व कनिष्टकर्मचा-यांना करुन देवून त्यांचेही ज्ञानात भर घातल्यास प्रलंबित कमी जास्त पत्रक काम त्वरेने उरकता येईल. अशी अपेक्षा आहे.

**नकाशा छपाई :-**

मंजूर योजनेचे नकाशा छपाई चे काम पूर्ण झाले असावे अशी धारणा आहे मात्र दुरुस्ती योजना / शुध्दीपत्रकाचे कारणाचे उपलब्ध योजनेच्या नकाशा आवश्यक त्या खात्याचे नकाशे क्षेत्र दुरुस्तीमुळे दुरुस्त करणे आवश्यक आहे . असे दुरुस्त केलेले नकाशे पुन्हा ट्रेंसिग करुन घेवून ते छापून घेण्याची कार्यवाही करणे अभिप्रेत आहे मात्र ब-याच ठिकाणी नकाशा दुरुस्तीची कार्यवाही झालेली नाही ती तातडीने करुन घेवून वर नमूद केल्याप्रमाणे दुरुस्त केलेले गांव नकाशे पुन्हा छापून घेणे अत्यावश्यक आहे याकडे ही लक्ष वेधण्यात येत आहे.

**उपसंचालक भूमि अभिलेख, संलग्न**
**जमाबंदी आयुक्त,(एकत्रीकरण)पुणे.**